पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

**मा.स्थायी समिती विशेष सभा**

कार्यपत्रिका क्रमांक - १६४

**सभावृत्तांत**

दिनांक – **०६/०३/२०२०** वेळ – दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची विशेष सभा **शुक्रवार** दिनांक **०६/०३/२०२०** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात **मा.श्रीम.रुबल अग्रवाल (भा.प्र.से.), पिठासीन प्राधिकारी तथा अतरिक्त आयुक्त महानगरपालिका,पुणे** यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.चोंधे आरती सुरेश
२. मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे
३. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे मयूर पांडुरंग
७. मा.कलाटे राहुल तानाजी
८. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९. मा.कदम शशिकांत गणपत
१०. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
११. मा.संतोष बबन कांबळे
१२. मा.अभिषेक गोविंद बारणे
१३. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१४. मा.फुगे भिमाबाई पोपट
१५. मा.पौर्णिमा रविंद्र(आप्पा)सोनवणे
१६. मा.सुलक्षणा राजू धर

याशिवाय मा.अजित पवार – अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.बोदडे - सहा.आयुक्त, मा.किरण गायकवाड – जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.पिठासीन प्राधिकारी - तथा अतिरिक्त आयुक्त महानगरपालिका पुणे.** सन्मा.सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करते. आजच्या विशेष सभेत स्थायी समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त, पुणे यांनी सभेची पिठासीन प्राधिकारी म्हणुन आदेश क्र.नपा/१/कावि/१६१/२०२०, दि.२७/०२/२०२०

च्या आदेशान्वये त्यांचा प्रतिनिधी म्हणून विशेष स्थायी समिती सभेची पिठासीन प्राधिकारी म्हणून **मा.श्रीम.रुबल अग्रवाल, (भा.प्र.से.) अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका, पुणे** यांना म्हणजे मला या ठिकाणी नियुक्त केलेले आहे.

मुक्त व निर्भयपणे मा.स्थायी समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामाकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

मी नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देते.

**(मा.सभापती, स्थायी समिती यांची निवड करण्यासाठी कार्यपध्दतीची माहिती देण्यात आली.)**

**मा.नगरसचिव -** मा.स्थायी समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१ (१) नुसार नेमणुक करणे.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१ (१) नुसार स्थायी समिती सभापती पदाची निवड करण्यासाठी विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त अथवा त्यांचा प्रतिनिधी असेल. मा.विभागीय आयुक्त यांचेकडील आदेश क्र.नपा/१/कावि/१६१/२०२०, दि.२७/०२/२०२० अन्वये मा.सभापती, स्थायी समिती यांची निवड करण्यासाठी विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त, पुणे यांचे प्रतिनिधी म्हणून **मा.श्रीम.रुबल अग्रवाल, (भा.प्र.से.), पिठासीन प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका, पुणे** यांची नेमणुक करणेत आलेली आहे.

मुदतीत दोन उमेदवारांनी प्रत्येकी एक या प्रमाणे एकूण ०२ (दोन) नामनिर्देशनपत्रे दाखल केली असून नामनिर्देशनपत्रे छाननी करिता मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहेत.

(मा.नगरसचिव यांनी त्यांना मुदतीत प्राप्त झालेली ०२ नामनिर्देशनपत्रे मा.पिठासीन प्राधिकारी यांच्याकडे सुपूर्द केली. मा.पिठासीन प्राधिकारी यांनी त्यांची छाननी केली.)

**मा.पिठासीन प्राधिकारी - तथा अतिरिक्त आयुक्त महानगरपालिका, पुणे**. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभापती, स्थायी समिती पदाकरीता दोन उमेदवारांची प्रत्येकी एक या प्रमाणे एकूण ०२ (दोन) नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामध्ये उमेदवार व त्यांचे सुचक अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १) | **संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे** | बुर्डे सुवर्णा विकास | लांडगे राजेंद्र किसनराव |
| २) | **पंकज दत्तात्रय भालेकर** | पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे | कलाटे मयूर पांडूरंग |

(या नंतर या नामनिर्देशन पत्रांवर उपस्थित सदस्यांना काही आक्षेप असल्यास त्यासाठी वेळ देण्यात आला.)

| | |
|---|---|
| **मा.पिठासीन प्राधिकारी - तथा अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका, पुणे** | मा.सभापती, स्थायी समितीचे पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एकूण ०२ (दोन) नामनिर्देशन पत्रांची छाननी करणेत आली असून **मा.संतोष (आणा) ज्ञानेश्वर लोंढे** यांनी एक नामनिर्देशनपत्र सादर केले असून त्यावर उमेदवार यांची स्वाक्षरी आहे. तसेच अनुमोदक - सुचक वेगवेगळे स्थायी समिती सदस्य असून त्यांची स्वाक्षरी असल्याने ते वैध ठरले आहे.<br>**मा.पंकज दत्तात्रय भालेकर** यांनी एक नामनिर्देशनपत्र सादर केले असून त्यावर उमेदवार यांची स्वाक्षरी आहे. तसेच अनुमोदक - सुचक वेगवेगळे स्थायी समिती सदस्य असून त्यांची स्वाक्षरी असल्याने ते वैध ठरले आहे.<br>सबब, स्थायी समिती पदाकरिता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.<br>**१) मा.संतोष (आण्णा) ज्ञोनश्वर लोंढे**<br>**२) मा.पंकज दत्तात्रय भालेकर** |

कोणत्याही उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन प्राधिकारी यांजकडे देऊन उमेदवारी मागे घेता येईल. याकरीता दुपारी १२.०८ वा. ते दुपारी १२.२३ वा. पर्यंत कालावधी निश्चित करुन देणेत आला.

मा.पिठासीन प्राधिकारी यांनी उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीत दुपारी १२.१५ वा. **मा.पंकज दत्तात्रय भालेकर** यांनी आपली उमेदवारी मागे घेण्याबाबतचा अर्ज समक्ष मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे सुपुर्त केलेला आहे.

| | |
|---|---|
| **मा.पिठासीन प्राधिकारी - तथा अतिरिक्त आयुक्त महानगरपालिका, पुणे.** | उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या वेळेमध्ये **मा.पंकज दत्तात्रय भालेकर यांनी** आपली उमेदवारी मागे घेणेबाबतचा अर्ज समक्ष माझ्याकडे सादर केलेला असलेने **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे. |

----------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ६९५९ | विषय क्रमांक - १ |
| दिनांक - ०६/०३/२०२० | विभाग - नगरसचिव |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या नामनिर्देशन पत्रांमधील मा.स्थायी समिती सभापती पदाची निवडणूक

लढविणारे **मा.पंकज दत्तात्रय भालेकर** व **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे** हे दोन वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. सभापती स्थायी समिती पदाची निवडणूक लढविणा-या उमेदवारांना उमेदवारी मागे घेण्याकरिता देण्यात आलेल्या १५ मिनिटांच्या वेळेमध्ये **मा.पंकज दत्तात्रय भालेकर** यांनी त्यांची सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन प्राधिकारी यांजकडे देवून त्यांची उमेदवारी मागे घेतली आहे. सबब मा.सभापती, स्थायी समिती पदाची निवडणूक लढविणारे **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

----------

( नवनिर्वाचित सभापती, मा.स्थायी समिती **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे** यांचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.)

----------

यानंतर मा.पिठासीन प्राधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
**(श्रीम.रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**
**पिठासीन प्राधिकारी**
**तथा अतिरिक्त आयुक्त**
**महानगरपालिका, पुणे.**
स्थायी समिती (विशेष सभा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१३३/२०२०
दिनांक : ०६/०३/२०२०



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.